जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 7 JUN 2021

पुढारी

# विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागात ऑनलाईन चर्चासत्रास प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत 'करियर अपॉर्च्युनिटी इन सिव्हिल इंजिनिअरिंग' या विषयावर वेबिनार झाला. याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. आयआयटी, रूर्की येथील रिसर्च स्कॉलर मंगेश जाधव यांनी सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रातील संशोधन संधीबद्दल मार्गदर्शन केले. स्ट्रक्चर व कन्स्ट्रक्शन विषयांमध्ये विविध संशोधन संधी उपलब्ध आहेत. याशिवाय सॉईल मेकॅनिक्स क्षेत्रांत भूस्खलन, भू-स्तराच्या विविध हालचाली, इमारतीचा पाया व मृदा यांच्यावर भूकंपामुळे होणारा परिणाम यांच्या संशोधनात्मक अभ्यासाची गरज आहे, असे ते म्हणाले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटच्या काळात सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रांत लाखो संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. पी. पी. फडणीस यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सिव्हिल इंजिनिअरिंग समन्वयक, सहायक प्रा.एम. एस. साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. सहायक प्राध्यापक इंजिनीअर एस. एम. पटवेगार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUN 2021
पुढारी

# आत्मविश्वास, नियोजनबद्ध अभ्यास हीच स्पर्धात्मक परीक्षेच्या यशाची गुरुकिल्ली

## शिशुपाल लाडेकर; विद्यापीठात ऑनलाईन वेबिनार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रबळ इच्छाशक्ती, आत्मविश्वास, नियोजनबद्ध अभ्यास व उजळणी हीच सिव्हिल इंजिनिअरिंग स्पर्धात्मक परीक्षेच्या यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन यवतमाळच्या सॉईल अँड वॉटर कॉन्झर्वेशन डिपार्टमेंटचे इंजिनिअर शिशुपाल लाडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत 'करिअर अपॉर्च्युनिटी इन सिव्हिल इंजिनिअरिंग' विषयावरील वेबिनारमध्ये ते बोलत होते. लाडेकर यांनी स्पर्धात्मक परीक्षेची तयारी व मृदा व जलसंधारण विभाग विषयक मार्गदर्शन केले. स्थानिक पातळीवरील जिल्हा परिषदेसारख्या संस्था स्वतःची परीक्षा घेऊन पात्र उमेदवारांची नोकरीची संधी देतात. कोणत्याही परीक्षेचे नियोजन करताना सर्वप्रथम अभ्यासक्रम डाऊनलोड करून घ्यावा. या परीक्षेच्या जुन्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न सोडवण्याचा सराव करावा. सहायक प्रा. डॉ. पी.पी. फडणीस यांनी स्वागत केले. सिव्हिल इंजिनिअरिंग समन्वयक सहायक प्रा. महेश साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. सहायक प्रा. एस. एम. पटवेगार यांनी आभार मानले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांचे मार्गदर्शन लाभले.